# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.३८२१/२४/अ.क्र.८१२३/२५**

**श्री.रत्नाकर शेट्टी**

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी एल विभाग
बृ.मु.म.पा. एल विभाग यांचे कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, १ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एल विभाग
बृ.मु.म.पा. एल विभाग यांचे कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, १ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.११.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०१.२०२४ | -- | २३.०२.२०२१ | २६.०३.२०२४ |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी श्री.रत्नाकर शेट्टी यांनी दाखल केलेल्या दि.२५.०१.२०२४ रोजीच्या जोडपत्रानुसार त्यांच्या दि.११.०५.२०२३ रोजी आरोग्य अधिकारी एल विभाग, कुर्ला येथे केलेल्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत ४ मुद्यांची माहिती मागितली असून यात विशेषत: सरीता इंडस्ट्रिज या कंपनीवर व तेथील केमिकल्समुळे होणारे प्रदूषण, सार्वजनिक आरोग्य तसेच वायू प्रदूषण याबाबतीत माहिती मागितली आहे.

तत्कालिन जन माहिती अधिकाऱ्यांनी या संदर्भातील माहिती ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या अखत्यारितील बाब असल्याचे उत्तर दिले असून त्याविरुध्द दाखल अपिल आदेशात अपिलीय अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य असल्याचा निर्वाळा दिलेला आहे त्याविरुध्द प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज अपिलार्थींनी दाखल केलेला आहे.

याच संदर्भात अपिलार्थी यांनी दि.११.०८.२०२३ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ येथे देखिल माहिती अर्ज दाखल केला त्यात मिळालेले उत्तर हे अतिशय असामाधानकारक असल्याने त्यातही त्यांनी प्रथम अपिल

अर्ज दाखल केला होता व उत्तरादाखल संबंधित उद्योगाची पहाणी करण्यात आली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उत्पादन बंदीचे आदेश देखिल पारित करण्यात आले असून त्याची प्रत सुनावणी दरम्यान अपिलार्थींना प्रदान करण्यात आली. तथापि, उपरोक्त प्रकरणी उद्योग बंद करण्याची नोटीस जारी करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात संबंधित आस्थापना अद्यापही कार्यरत असून या बाबतीत कुठलीच कार्यवाही प्रत्यक्षात करण्यात आली नसून अपिलार्थी यांनी दि.१२.०४.२०२४, १२.०६.२०२४ व २४.०७.२०२४ रोजी याचा पाठपुरावा नियंत्रण प्रदूषण मंडळाकडे केला असून महानगरपालिकेकडेही उपरोक्त आदेश अंमलबजावणी करण्याबाबत पाठपुरावा केल्याचे आढळून येते.

प्रस्तुत प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या मर्यादित कक्षेत महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आलेला प्रतिसाद हा **कलम २ (च)** प्रमाणे असला तरी या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्यक्षपणे प्रदूषण पसरविणाऱ्या उपरोक्त उद्योग आस्थापनेविरुध्द ती तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले असताना त्याचे अनुपालन झाले नसल्याची बाब आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थींनी निदर्शनास आणून दिली आहे.

उपरोक्त प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी नागरिकांचे स्वास्थ्य धोक्यात येईल याद्वारे प्रचलित नियमानुसार व प्रदूषण नियंत्रण कायद्यानुसार त्यांना प्रदत्त केलेल्या अधिकारांतर्गत योग्य ती कार्यवाही लवकरात लवकर करण्याच्या सूचनेसह प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

## आदेश

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Maharashtra ★

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २४-११-२०२५**

प्रत-

१) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

२) सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका एल विभाग यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे.